RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यात शिक्षकाची भूमिका

**प्रा. हेडे सचिन सुरेश**
मातोश्री गिरिजाबाई ढोबळे
महिला षिक्षण महाविद्यालय, जुळे सोलापूर

**प्रास्ताविक**

भारतात अनेक बालकांना अगदी जन्मापासून योजनापूर्वक त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले जाते. कुटुंब, शाळा समाज आणि शासन व्यवस्था यांनी बालहक्काची जितक्या गांभिर्याने दखल घ्यायला पाहिजे तितकी घेतली जात नाही असे दिसते. आज भारतात 50 टक्के लोकसंख्या ही 20 वर्षे वयाच्या आतील आहे. जर 2020 पर्यंत 'भारत जगातील महासत्ताक राष्ट्र' हे स्वप्न साकार करावयाचे असेल तर बालकांच्या हक्काकडे आपल्याला लक्ष द्यावे लागेल़, परंतु आपल्या समाजात बालकांच्या हक्कासंदर्भात फारषी जागृत नाही.

**बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क**

महाराष्ट्रा संदर्भात 'युनिसेफ' च्या लोकसंख्या अभ्यासानुसार राज्यात 49 टक्के मुले कुपोषित आहेत. 25 टक्के मुले शिक्षणापासून वंचित आहेत. तर 50 टक्के स्त्रिया या निरक्षर आहेत.

भारतात इ.स. 1991 च्या जणगणनेनुसार 5 ते 14 वयोगटातील एकूण बालकांची संख्या 203.3 दशलक्ष होती. त्यापैकी 11.28 दशलक्ष बालक बालमजूर होते. 6.18 दशलक्ष मुले व 5.10 दषलक्ष मुली होत्या. भारतात जवळपास 91 टक्के बालकामगार ग्रामीण भागात आहे. तर 9.13 टक्के बालकामगार शहरी भागात आहे.

ग्रामीण भागात गरीब बालकांना शिक्षण अर्ध्यावर सोडून स्वतःच्या शेतावर अथवा दुसऱ्याच्या शेतावर बालमजूरी करावी लागते. परिणामी शाळेतील गळतीचे प्रमाण वाढते. पुढील तालिकेवरुन ते स्पष्ट दिसून येते.

प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तर

| | 1960–61 | 1970–71 | 1980–81 | 1990–91 | 1992–93 | 1990–2000 | 2000–01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **वर्ग 1 ते 4** | | | | | | | |
| मुले | 61.7 | 64.5 | 56.2 | 40.1 | 43.8 | 38.7 | 39.7 |
| मुली | 70.9 | 70.9 | 62.5 | 46.0 | 46.7 | 42.2 | 41.9 |
| एकूण | 64.9 | 67.0 | 58.7 | 42.6 | 45.0 | 40.3 | 40.7 |
| **वर्ग 1 ते 8** | | | | | | | |
| मुले | 75.0 | 74.6 | 68.0 | 59.1 | 58.2 | 52.0 | 50.3 |
| मुली | 85.0 | 83.4 | 79.4 | 65.1 | 65.2 | 58.0 | 57.7 |
| एकूण | 78.3 | 77.9 | 72.7 | 60.9 | 61.1 | 54.5 | 53.7 |
| **वर्ग 1 ते 10** | | | | | | | |
| मुले | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | 69.8 | 67.5 | 70.0 | 66.6 | 66.4 |
| मुली | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | 86.6 | 76.9 | 77.3 | 70.6 | 71.5 |
| एकूण | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | 82.5 | 71.3 | 72.9 | 68.3 | 68.58 |

शिक्षणातील गळती कमी करणे या उद्येषाने मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम हा ऑगस्ट 2009 मध्ये संसदेने संमत केला. त्यानंतर राष्ट्रपतीच्या मान्यतेनंतर हा अधिनियम 1 एप्रिल

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

2010, पासून संपूर्ण देशभर (जम्मू व कष्मिर वगळता) लागू होत असल्याची अधिसूचना जारी करण्यात आली. याच दिवषी 86 व्या घटना दुरुस्ती नुसार 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीच्या षिक्षणाचा हक्क प्राप्त झाल्याचे ही अधिसूचित करण्यात आले.

**बालकांचा हक्काचे स्वरुप**

भारतातील 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांच्या हिताच्या दृष्टीने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 पारित होणे हा क्रांतीकारी क्षण आहे.

बलकांना शिक्षणाचा हक्कानुसार महत्त्वाच्या तरतुदी पुढील प्रमाणे.

**बलकांचा षिक्षण हक्कातील तरतुदी**

→ चाळणी प्रकिया षिवाय प्रवेश
→ नि:षुल्क प्रवेष व शिक्षण
→ वयानुसार प्रवेष व शिक्षण
→ वर्षभरात केव्हांही प्रवेश
→ वयाचा पुरावा नसल्यासाही प्रवेश
→ दाखला हस्तांतरण
→ शिक्षणातील सातत्य
→ शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र
→ हक्कांचे संरक्षण
→ बालस्नेही शिक्षण
→ मंडळाच्या परीक्षांची सक्ती नाही.

1) बाल हक्क शिक्षण कायद्यानुसार बालकांना कोणत्याही चाळणी प्रक्रियेशिवाय शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या प्रवेशपात्र असणाऱ्या बालकांना प्रवेश घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.
2) 6 ते 14 वयोगटातील बालकांना आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करताना त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची फी घेता येणार नाही.
3) बालकांना त्याच्या वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश मिळणाचा हक्क आहे. उदा 8 वर्षे बालकास तिसरीच्या वर्गात प्रवेश.
4) वाढीव कालावधीनंतरही बालकाला शाळेत प्रवेश दिला जाईल.
5) बालकाला शाळेत प्रवेश घेताना, त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचा वयाचा पुरावा नसला तरीही त्याला षाळेत प्रवेश दिला जाईल.
6) बालक शिकत असलेल्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची सोय नसल्यास त्याला नजिकच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा हक्क आहे.
7) शिक्षणातील सातत्य याचा अर्थ बालकाला वर्गात मागे ठेवता येणार नाही व शिक्षण पूर्ण होईपर्यंत काढून टाकता येणार नाही.
8) बालकाने प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क आहे.
9) बालकांच्या हक्काचे संरक्षण करण्यासंदर्भात 'बालक राज्य बालहक्क संरक्षण आयोग' स्थापन करण्यात आला आहे. तसेच हेल्पलाईन, एस.एम.एस., दूरध्वनी व पत्राद्वारे तक्रार नोंदवता येते.
10) बालकांना बालस्नेही आनंददायी षालेय वातावरणात बालकेंद्रीत पध्दतीने शिक्षणपूर्ण करण्याचा हक्क आहे.
11) प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत बालकांना कोणत्याही परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असणार नाही.

**शिक्षकाची भूमिका**

शिक्षणाच्या सार्वत्रीकीकरणामध्ये शिक्षक म्हणून आपली भूमिका फार महत्वाची आहे. शाळेत आलेल्या बालकांच्या व्यक्तीमत्वांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील असतो. त्यामुळे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अनियमानुसार आपली भूमिका समजावून घेणे महत्त्वाचे असते, त्या पुढील प्रमाणे आहेत.

- → भावनिक आधार देणे
- → स्मायोजन साधण्यास पोषक वातावरण
- → बालाकाच्या व्यवहाराज्ञानाचा वापर
- → शाळेतील इतर विद्यार्थ्यांना करुन देणे.
- → भाषा व गणित विषयांचा संपादणुकीचा आढावा घेणे.
- → सर्वकष मूल्यमापन तंत्राचा वापर करणे
- → विद्यार्थ्यांच्या सामाजिक कमतरतेचा शोध घेणे
- → स्वयंस्थितीवर भर देणे
- → वर्तनात नियमितपणा व वक्तशिरपणा ठेवणे
- → पालक सभाचे आयोजन करणे
- → अतिरिक्त व पूरक मार्गदर्शन
- → शैक्षणिक उपक्रम कार्यात सहभाग घेणे.
- → शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे.
- → अशैक्षणिक कामांना नकार देणे
- → खाजगी षिवकणी न घेणे
- → शाळा व्यवस्थापन समितीत सहभाग
- → शैक्षणिक अर्हता वाढविणे

**1) भावनिक आधार देणे** बालहक्क कायद्यानुसार बालकांना त्यांच्या वयानुरुप वर्गात प्रवेश दिला जातो. काही वेळा उशिरा प्रवेषित बालकांना सर्वप्रथम नवीन वातावरणाशी समायोजन करावे लागते अशा परिस्थितीत भावनिक आधाराची गरज राहील म्हणून शिक्षक नात्याने त्यांना भावनिक आधार देणे ही आपली जबाबदारी आहे.

**2) समायोजन साधण्यास पोषक वातावरण** वयानुसार प्रवेषित किंवा उशिरा प्रवेशित बालकांना शालेय परिसराबद्दल भिती, कतुहल निर्माण होते. असे प्रवेशित बालक हे अबोल, शालेय अभ्यासात मागे राहू नये म्हणून समायोजन साधण्यास पोषक वातावरण निर्मिती करावी.

**3) बालकांच्या व्यवहार ज्ञानाचा वापर इतर विद्यार्थ्यांना करुन देणे** वयानुरुप प्रवेश दिलेले बालक शाळेच्या बाहेर दैनंदिन जीवनातील विविध व्यवहार व कौषल्य शिकलेले असू शकेल अशा बालकाच्या अंगी असलेले व्यवहारज्ञान व कौषल्यांचा उपयोग इतर मुलांना शिकविण्याकरिता होईल व त्याला शाळेविषयी आत्मीयता निर्माण करता येईल.

**4) भाषा व गणित संपादणुकीचा आढावा घेणे** वयानुरुप उशिरा प्रवेशित झालेल्या बालकांच्या विषेषतः भाषा व गणित विषयांच्या संपादणूकीचा आढावा घेणे व अशा बालकांना विशेष शिक्षण देऊन त्या बालकाला त्याच्या वर्गाच्या संपादणूक पातळीपर्यंत आणावे.

**5) सर्वकष मुल्यमापन तंत्राचा वापर** बालकांचा शिक्षण हक्क कायद्यानुसार बालकांना मागे ही ठेवता येणार नाही. आणि काढूनही टाकता येणार नाही. मुल्यमापन तंत्राचा वापर करुन अध्यापन पध्दतीत बदल करणे, विषेष शैक्षणिक साहित्य वापरणे, गरजाधिष्ठत अध्ययन अनुभवांची निवड करणे ही आपली जबाबदारी आहे.

**6) विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक कमतरतेचा शोध घेणे** बालकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती खूप महत्त्वाची आहे. वारंवार गैरहजर राहत असलेल्या बालकांना शाळाबाह्य राहण्याची अनेक कारणे असतात. आर्थिक, सामाजिक, प्रषासकीय कारणामुळे मूल वर्गात दंगा करणे, इतरांना त्रास देणे, अगदीच

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

शांत बसणे, कोणत्याही कृतीमध्ये सहभाग न घेणे, अनियमित गैरहजर असणे, अषा नेमक्या कारणाचा शोध घेणे ही आपली जबाबदारी शिक्षक म्हणून महत्त्वाची असणार आहे.

**7) स्वयंशिस्तीवर भर देणे** बालकांचा मोफत शिक्षण हक्क कायद्यानुसार अभ्यास न करणे, उशिरा येणे, उत्तरे न देणे, गणवेश न घालणे, सूचनांचे पालन न करणे या कारणास्तव कोणत्याही प्रकारची शारिरीक व मानसिक शिक्षा करता येणार नाही. अषा वेळी शिक्षकांने आपल्या अपेक्षा, नियम मर्यादा या विषयी विद्यार्थ्यांषी सुस्पष्ट संवाद साधणे, शिक्षक विद्यार्थी परस्पर आदरयुक्त प्रेमळ नात्यांची बांधणी करणे अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुसंवादी व आनंददायी करुन बालकांना स्वयंस्थितीवर भर देण्यास प्रेरित करणे.

**8) वर्तमान नियमितपणा व वक्तशिरपणा** बालकांनी शाळेत वक्तशीर राहवे अषी आपली अपेक्षा असेल तर एक शिक्षक म्हणून आपणही नियमितपणे व वक्तशिरपणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**9) पालक सभाचे आयोजन करणे** शिक्षक व पालक यांच्यातील दुरावा कमी करुन संवादातून भावनिक जवळीकता साधण्यासाठी शिक्षक – विद्यार्थी समाज यांच्या सुसंवाद साधण्यासाठी पालक सभांचे आयोजन करावे व त्याद्वारे सुसंवाद साधने गरजेचे आहे.

**10) शैक्षणिक कार्यक्रमात सहभाग** शिक्षकाला अध्यापन करताना अनेक अनुभव येतात या अनुभवांचा वापर शिक्षकाला अभ्यासक्रम विकसन, मुल्यमापन प्रक्रिया, प्रशिक्षण रचना, पाठ्य पुस्तक विकसन या सारख्या शैक्षणिक उपक्रम कार्यक्रमात सहभाग घेणे ही जबाबदारी आहे.

**11) अतिरिक्त व पुरक मार्गदर्शन** सातत्यपुर्ण सर्वकष मूल्यमापनाद्वारे प्रत्येक बालकाला संपादणूक पातळीपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलांना अतिरिक्त पुरक मार्गदर्शन करणे ही शिक्षकाची जबाबदारी आहे.

**12) शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे** शालेय परिसरातील 6 ते 14 वयोगटातील सर्व बालकांच्या शिक्षणाची जबाबदारी आपली आहे. त्यामुळे शाळा परिसरातील मुलांची माहिती समाज प्रतिनिधी, पालक, विद्यार्थी व स्वतःच्या निरीक्षणातून घेऊन शाळा बाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षण देणे ही जबाबदारी आहे.

**13) अशैक्षणिक कामांना नकार देणे** बालक हक्क शिक्षण कायद्यांतर्गत विविध शैक्षणिक संस्थांची कामे, खाजगी कामे, शासकीय कामांना कायद्याचा आधार घेऊन नकार देता येतो.

**14) खाजगी शिवकणी न घेणे** शिक्षक शाळेव्यतिरिक्त वेळेमध्ये विद्यार्थ्यांना निशुल्क मार्गदर्षन करतात याची फलनिष्पत्ती बालकांच्या नियमित व स्पर्धा परिक्षेतील यषावरुन लक्षात येते. परंतु सशुल्क खाजगी शिवकणी घेतल्यास बालकांमध्ये संपादणूक क्षमता असूनही मनात अकारण न्यूनगंड निर्माण होतो. त्यामुळे खाजगी शिकवणी न घेणे हे एक शासनाचा सेवक म्हणून आपली जबाबदारी असेल.

**15) शाळा व्यवस्थापन समिती सहभाग** शाळा व्यवस्थापन समितीमध्ये आपणांस स्थान मिळाल्यास शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक सभामध्ये सहभागी होऊन शिक्षकांची मते, अडचणी एक प्रतिनिधी या नात्याने शाळा व्यवस्थापन समितीमध्ये मांडणे व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीमध्ये दुवा निर्माण करणे ही जबाबदारी असेल.

**16) शैक्षणिक अर्हता वाढविणे** नवीन पदव्या धारण करणे महत्त्वाचे नसले तरी तसेच नव नवीन शैक्षणिक विचार व प्रयोग या बाबतची माहिती अद्ययावत ठेवून चिंतन करणे आवश्यक आहे व याद्वारे शैक्षणिक अर्हता वाढविणे ही आपली जबाबदारी आहे.

**संदर्भ सूची**

1. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणहक्क अधिनियम 2009.
2. महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा, 2010
3. सातत्यपूर्ण सर्वकष मुल्यमापन मार्गदर्शिका भाग1 व 2.
4. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क व नियम 2011.
5. योजना विशेषांक जानेवारी 2008.
6. योजना विशेषांक सप्टेंबर 2009.